महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

**File No.:DMER-11019/3/2026-CETIT** दिनांक – स्वाक्षरी खाली नमूद

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय/महानगरपालिका/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित
वैद्यकीय महाविद्यालये महाराष्ट्र राज्य

**विषय-वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर करावयाच्या सामाजिक दायित्व सेवेची अट रद्द करणेबाबत**

**संदर्भ-शासन निर्णय क्र.एमईडी १०२६/प्र.क्र.२३९/शिक्षण- दिनांक २३.०७.२०२६**

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय/महानगरपालिका/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांतून वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर करावयाची एक वर्षाची सामाजिक दायित्व सेवेची अट रद्द करण्यात आलेली आहे. तसेच वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरच्या सामाजिक दायित्व सेवेच्या अटीबाबत संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद विविध शासन निर्णयांतील तरतूदी देखील खालील अटींच्या अधीन राहून अधिक्रमित / रद्द करण्यात आलेल्या आहेत.

१. जे उमेदवार सामाजिक दायित्व सेवेस पात्र असून देखील त्यांना सामाजिक दायित्व सेवेचे अद्यापी वाटप झालेले नाही अथवा काही कारणास्तव त्यांना सामाजिक दायित्व सेवा पूर्ण करता आलेली नाही, अशा उमेदवारांना नव्याने अथवा उर्वरीत कालावधीकरीता सामाजिक दायित्व सेवा पूर्ण करण्याची आवश्यकता राहणार नाही.
२. सद्यस्थितीत ज्या उमेदवारांची सामाजिक दायित्व सेवा सुरु आहे त्यांना उर्वरीत विहित कालावधीकरीता सामाजिक दायित्व सेवा पूर्ण करणे हे अनिवार्य राहील.
३. सदर शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापर्यंत ज्या उमेदवारांना ऑनलाईन पोर्टलव्दारे नोंदणी केल्यानंतर सामाजिक दायित्व सेवा उपलब्ध झालेली आहे व त्यानुसार सदर उमेदवार सामाजिक दायित्व सेवेच्या ठिकाणी रुजू झालेला असेल तर त्यास सामाजिक दायित्व सेवा पुर्ण करणे अनिवार्य राहील. तथापि असा उमेदवार सामाजिक दायित्व सेवेच्या ठिकाणी रुजू झालेला नसेल तर त्यास सामाजिक दायित्व सेवा पुर्ण करण्याची आवश्यकता राहणार नाही.
४. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून कोणत्याही उमेदवारास सामाजिक दायित्व सेवेचे वाटप करण्यात येऊ नये. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमानंतर सामाजिक दायित्व सेवेचे वाटप करण्यासाठी तयार करण्यात आलेले ऑनलाईन पोर्टल तातडीने बंद करण्यात यावे.

५. ज्या उमेदवारांनी सामाजिक दायित्व सेवेबाबत यापूर्वी निर्गमित विविध शासन निर्णयांतील तरतूदींप्रमाणे विहित केलेल्या दंडाच्या रक्कमेचा भरणा करुन सदर सेवेतून सूट मिळविलेली आहे, अशा उमेदवारांना सदर दंडाच्या रक्कमेचा कोणताही परतावा अनुज्ञेय असणार नाही.

उपरोक्त शासन निर्णयातील अटी शर्ती नुसार कळविण्यात येते की, वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना मुळ प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेल्या अटींचे तंतोतंत पालन करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
ANIL BHANDARI
Date: 08-08-2026
18:32:58

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई